वर्ष चौथे : अंक ८वा

सप्टेंबर २००८

मूल्य : १०रु.

चांगल्या विचारांना वाहिलेली एक चळवळ

# विचार – प्रसार

संपादक : नारायण डोंगरे

कार्यकारी संपादक : शिवाजी भगत





## अंतरंग

- स्वातंत्र्याची वाटचाल
- संस्कृती चालली बिघडत
- माहिती अधिकार
- व्यसन मुक्ती
- एंग्री यंग मॅन
- गुन्हेगाराची निर्मिती

नवसाला पावणारे गणपती



Scanned with CamScanner

# राजकारण्यांनी फसवलं ?
# नोकरशहांनी रखडवलं
# गुंडांनी लुटलं ?

**बस्स, आता आम्हाला न्याय पाहिजे !**

## आता कोण मिळवून देईल न्याय ?

## उत्तर एकच ....





# कस्टडी रिमांड

• संपादक : शिवाजी विश्वनाथ भगत

कला, क्रिडा, गुन्हेगारी, संस्कृति, ज्ञान, विज्ञान,
मनोरंजनाचा अनोखा नजराना

**◆ प्रमुख कार्यालय ◆**

अमित सागर को.ऑ.हौसिंग सोसायटी, रुम नं.२/ओ, पेंडसे नगर,
डोंबिवली (पूर्व) जि.ठाणे.

भ्रमणध्वनी : ९२२४५०४१९१ / ९२२१०२६६६०

उल्हासनगर विभागीय कार्यालय : ब्राम्हणपाडा, कांबळे चाळ,
विशाल किराणा स्टोअर्स, उल्हासनगर - ३.

Scanned with CamScanner

॥ श्री गणेशाय नमः ॥



हिन्दू संस्कृतीत आपण कोणत्याही मंगलप्रसंगी श्रीगणेशाचे पुजन, स्तवन करतो. त्याचे आशिर्वाद घेतो आणि मगच पुढील कार्यास प्रारंभ करतो.

कारण श्री गणेश हि देवता भक्ती भावाने पुजनाऱ्या भक्ताचे सुखकर्ता दुःखकर्ता आहे. सर्व गणांची अधिदेवता आहे, आपल्या दैनंदिनी संघर्षमय जीवनात सुख,शांत, ऐश्वर्य, वैभव, यश, किर्ती,धन लक्ष्मी, विद्या, बुद्धी या सर्वांची अत्यंत निनांत गरज भासते.

श्रीगणेश देवतेच्या कृपेने हे सारे प्राप्त होते कारण श्री गणेश देवाचाही अधिपती आहे. असा विश्वास आहे की हि सर्व श्रीगणेशाची देवस्थाने जागृत आहेत म्हणूनच आपण या सर्वांना नवसाला पावणारे श्रीगणेश गणपती म्हणू लागलो आहोत. असे हे श्रीगणेशाचे प्रमुख देवस्थाने वाचकांच्या माहितीसाठी देत आहोत.



**प्रकाशक**

# ❊ नवसाला पावणारे गणपती ❊

| | |
|---|---|
| श्री सिद्धी विनायक | प्रभादेवी, मुंबई |
| श्री महागणपती | फडकेवाडी, गिरगांव |
| श्री महागणपती | विवाह विना[illegible] टिटवाळा |
| दशभुज मल्लेश गणपती | बुधवार पेठ, पुणे |
| दशभुज चिंतामणी | सहकार नगर, पुणे |
| श्री सिद्धी विनायक | सारस्वत बाग, पुणे |
| श्री त्रिगुंडे गणपती | सोमवार पेठ, पुणे |
| श्री मंजुरेश्वर मोरगांव | मोरेगांव, ता. पुरंदर, जि. पुणे |
| श्री चिंतामणी | थेऊर, पुणे |
| तळ्याकाढचा गणपती | मिरज, जि. सांगली |
| श्री वरेण्यपुत्र गणपती | राजुर, जि. जालना |
| श्री चिंतामणी | कळंब |
| श्री सिद्धीविनायक | नागपूर |
| स्वंयभू मांदार गणेशा | अक्कलकोट |
| आशापूरक गणेश | बीड जिल्हा |
| श्री विज्ञान गणेश | राक्षसभुवन |
| नवगणपती | राजुरी |
| महागणपती | सिन्नर |
| श्री मोदकेश्वर | नाशिक |
| श्री वणीचा गणपती | सप्तश्रृंगी गड |
| श्री लक्षविनायक | वेरुळ, औरंगाबाद |
| श्री लंबोदर | गणपती पुळे |
| श्री परशुराम गणेश | ता. चिपळून |
| महागणपती सिद्धीविनायक | खेड, ता. रत्नागिरी |
| श्री बल्लाळेश्वर | पाली, सुधागड |



Scanned with CamScanner




कार्यकारी संपादक
शिवाजी भगत

संपादक मंडळ
नारायण डोंगरे
उपसंपादक
शुभांगी पाटील
विशेष प्रतिनिधी
संजय भगत
क्राईम रिपोर्टर
विनोद ग्रेटकर
कार्यालय प्रतिनिधी
प्रणय पाटील
जाहिरात प्रतिनिधी
वामन अभंग
पत्रकार
गंगा मॅडम
फोटोग्राफर
विजय सोनावणे
विशिष्ट सहकारी
प्रल्हाद सोनवणे
वि. के. भाटकर
सुहास पाटील
सदानंद सुर्यवंशी
साहित्यीक / सल्लागार संपादक
भानु किरण विशारद, लालबहादुर विशारद
प्रमुख सल्लागार
डॉ. अशोक भाऊ सुळे
सुधिर हेगिस्टे
मांडणी व सजावट
निर्मला मॅडम, अशोक झा



मालक श्री. शंकर मुकुंद पोखरकर
प्रकाशक श्री. राजेंद्र ग. डोंगरे
पत्ता : स्मिता एंटरप्रायझेस, शिवनेर सदन, मोहीली विलेज, साकीनाका, मुंबई - ७२ येथे छापून ७/१.
प्रकाशन : डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२
वादविवाद असल्यास ठाणे न्यायालयीन क्षेत्र, ठाणे जिल्हा.
MAH/MAR/26477/131/2004-TCL


# अंतरंग


■ वर्ष : चौथे ■ अंक : सप्टेंबर


| अंतरंग | पान क्र. |
|---|---|

| १. मनोगत दोन शब्द | ४ |
| २. असं म्हणतात की | ४ |
| ३. विचार प्रसार शब्द स्नेह | ५ |
| ४. स्वातंत्र्याची वाटचाल | ६ |
| ५. पोलीसही माणूस आहे | ८ |
| ६. आदर्श शिक्षक होण्यासाठी | ९ |
| ७. कुमारानों आदर्श पाळा | ९ |
| ८. संस्कार सिंचन | ९ |
| ९. संस्कृती चालली विघडत | १० |
| १०. अँग्री यंग मॅन | १२ |
| ११. टिळकांनी स्वराज्य मिळवून दिले | १३ |
| १२. माहिती अधिकाराचा दुरुपयोग | १४ |
| १३. विचार प्रसार आपल्या मदतीला | १५ |
| १४. कविता - श्रावण आरती | १५ |
| १५. आरोग्य - डोळयांची निगा व दोष | १६ |
| १६. पत्रकार संघाच्या अध्यक्षांचा जाहिरनामा | १७ |
| १७. आरोग्य - रोगांवर अन्न हेच औषध | १८ |
| १८. उत्सव -आशिर्वादका पर्व १५ ऑगस्ट | १९ |
| १९. कविता - गौरव है हम भारतवासी | २० |
| २०. तीन गोष्टीचा महिमा | २१ |
| २१. हि कसली बुध्दीमानी | २१ |
| २२. गृहस्थी-घर संसार सुखी होण्याची सात सुत्रे | २२ |
| २३. व्यसन मुक्ती | २२ |
| २४. मनुष्याच्या अंगी एवढे गुण असावेत | २२ |
| २५. कवित–नावात काय आहे ? | २३ |
| २६. जरा विचार करा | २३ |
| २७. तुम्ही काय करु इच्छिता | २३ |
| २८. महागाईचा भस्मासुर | २४ |
| २९. गुन्हेगारांची निर्मिती व विकास | २५ |
| ३०. उखाने/ओळखा पाहू | २६ |
| ३१. सुवासिनींनी घ्यावयाची नावे | २६ |
| ३२. आई आणि बाळ दोघेही खुष | २८ |
| ३३. विचार प्रचार जाहिरात पत्रक | २९ |
| ३४. शब्द कोडे | ३०. |





Scanned with CamScanner

# मनोगत

कोणताही समाज आपली परंपरा आपली संस्कृती आपल्या रिती-रिवाजाचा परित्याग करून जिवंत राहू शकत नाही हे जेवढे आवश्यक आहे त्यामध्ये समाज परिवर्तन होत असते. परिवर्तन होणेपण प्रकृतीचा नियम आहे पण परिवर्तन न होता महापरिवर्तन झाले तर अशंका बनते. योग्य परिवर्तन तर आपणास आत्मसात केले पाहिजे.

परंतु योग्य व अयोग्य याचे अगोदर पहिले ज्ञान होणे आवश्यक आहे. पण चाल, रुढी, अंधविश्वास आणि अंधश्रध्दा यांना सोडल्याशिवाय आपली प्रगती होऊ शकत नाही. आपण उज्ज्वल भविष्याची कामना करु शकत नाही. आपला समाज आज पण अंधश्रध्दा, चाल-रित आणि अंधविश्वासाचा शिकार झालेला आहे. आमचा प्रयत्न आहे की, यातून निघून एका नवीन समाज अभिनव संकल्पना करु, ज्यामध्ये हिंसा, व्याभिचार, सदाचार, अविचार, भिती यांचा गाजावाजा न करता जर, आपण आपली कामना आवश्यक मर्यादित ठेवल्या तर

# ...दोन शब्द

आपले जीवन निश्चित सुखी आणि आनंदमय होईल. गीतासुध्दा हाच संदेश, उपदेश करते की, कर्मावर आपला अधिकार आहे पण त्याच्या फलावर नाही. याचा अर्थ की कर्म करु नये, करा पण कुकर्म नको सुकर्म करा. मानव जीवनाचे लक्ष सुध्दा हेच आहे की चार दिवसांचे [illegible] ...ावमुक्त होऊन आनंद व शांतीने जगा व दुसऱ्यालाही मदत करुन त्याचेही मनोगत पूर्ण केल्याने जो आनंद मिळतो तोहि मिळावा हेच आम्हाला वाटते. आशा आहे की आमचे वाचक पण या मताशी सहमत असतील किंवा राहतील असे नाही. आमचा प्रयत्न निस्वार्थी भावनेतून असेल.

वाचक आम्हास नेहमीच कुठल्या ना कुठल्या रुपाने मदत करत आलेत. आताही विचार प्रसार मासिकातून आपणापर्यंत येण्याचा योग आला. असो धन्यवाद.

कार्यकारी संपादक
विचार प्रसार


अक्षय जीवन तव लाभो !

विचार प्रसार परिवारातर्फे

*६१ व्या वाढदिवसाच्या*

***हार्दिक शुभेच्छा***

**श्री. अशोक उर्फ भाऊ सुळे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य भारतीय कृषी पत्रकार संघ (दिल्ली)


# असं म्हणतात की...

१. पादत्रणे ईशान्य दिशेला ठेवू नयेत.

२. घडयाळ, आरसा उत्तर-पूर्व दिशांना ठेवावा.

३. अग्निशी संबंधित उपकरणे आग्नेय दिशेला ठेवावी.

४. मृगनक्षत्राच्या वारी बहुतेक पावसाची सर्व नक्षत्रे असतात.

५. पुनर्वसु, मघा, चित्रा, स्वाती इ. नक्षत्रांवर "बी"पेरणी करावी.

६. मंगळवारी तसेच शनिवारी शेती-बागायतीची लागवडीची कामे करू नयेत.

७. चित्रा, स्वाती, धनिष्ठा शततारका इ. नक्षत्री भूमिपूजन /पायाभरणी करू नयेत.

८. घरासारखी पुष्कळ वर्षे टिकरणारी कामे रोहिणी, तिन्ही उत्तरा इ. नक्षत्री करावीत.

९. पुनर्वसु, अनुराधा, ज्येष्ठा, हस्त, चित्रा, स्वाती, मृग, रेवती, अश्विनी या नक्षत्री मोटारगाडी घ्यावी.

१०. गृह व भूमी याचा क्रय - विक्रय करण्यास गुरुवार/ शुक्रवार इ. वार असावेत तसेच मूळ, मृग, तिन्ही पूर्वा,

(पान २१ वर)



Scanned with CamScanner

# विचार प्रसार

**वि** चार वंताच्या लेखणीतुन साकारणारे

**चा** कर मान्यांना आवडणारे

**र** यतेच्या मनातलं ओळखणारे

**प्र** त्येकाला आवडणारे मासिक

**सा** रासार विचार करावयासं लावणारे

**र** मत, गमत वाचकांना आनंद देणारे

असे हे मासिक आपल्या हाती पडताच विचार प्रसार बद्दल काय लिहावयास वाटल्यास आमच्या खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा, उत्कृष्ट पत्रास बक्षीस पात्र ठरवून पुढील अंकी त्याचे नाव व बक्षीस प्रत्यक्ष कार्यालयात बोलावून देण्यात येईल.

संपादक
विचार प्रसार



कै. बि. ए. देवळी

आभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे वरदान आहे. त्याचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे.

- शिवाजी भगत

## भावपूर्ण श्रध्दांजली



कै. नागेश गोविंद करमरकर



कै. अनिल फडके

आपली कमी कोणीही भरु शकत नाही आपल्या आठवणी अनुभव अविस्मरणीय आहेत.

गुरुपौर्णिमा निमित्त आपल्या ऋणातुन मुक्ती मिळावी. आपले अनुभव आमच्या पाठीशी सदेव आहेत.

आपण जे मार्गदर्शन केले त्याबद्दल आपले आभार आपल्या ऋणातुन मुक्त होण्याचा एक प्रयत्न.

शिवाजी विश्वनाथ भगत
कार्यकारी संपादक



Scanned with CamScanner

## स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेष संपादकीय

# स्वातंत्र्याची एकसष्ठी वाटचाल

या १५ ऑगस्टला आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ६१ वर्ष पूर्ण झाली आणि ६२ व्या वर्षात आपण पदार्पण करत आहोत.

या ६१ वर्षात भारत देशाला चांगले दिवस आले. या ६१ वर्षात आपण खूपच नेत्रदिपक प्रगती केली. आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण होत आहे.उदयोगधंद्याची भरभराट होत आहे. आज भारतीय उदयोगपती अमेरिका आणि जगातील मोठमोठया कंपन्या विकत घेत आहेत. ह्यात टाटा, बिर्ला, मित्तल, ह्यांच्याबरोबर अंबानी पेक्षा लहान उद्योगपती आहेत.

संरक्षणाच्या बाबतीत आपण हजारो किलोमीटर लांब अंतरावर असणाऱ्या दुसऱ्या देशांच्या शहरांवर बॉम्ब फेकणारी 'अग्नी' सारखी क्षेपणास्त्रे एवढेच नव्हे तर आपण अणुबाम्बंची यशस्वी चाचणीही केली आहे.

देशात शाळा कॉलेजांचे प्रमाण वाढले आहे.उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये आणि आभिमत विद्यापीठेही वाढत आहेत. त्याचबरोबर साक्षरतेचे प्रमाण देखील वाढत आहे.

दळणवळणाच्या क्षेत्रातही आज देशाने भरपूर विकास केले आहे. आज देशातील गावा-गावात आणि घरा-घरात मोबाईल आला आहे: आपले स्वत:चे उपग्रहही आता आकाशात फिरत आहेत.

भारतात गरीबांचे प्रमाण ही कमी होत आहे. पुढील ३०-४० वर्ष भारत देश एकसंध राहिला तर हे प्रमाण कमी होत-होत १० ते २० टक्के पर्यंतही येईल.

या ६१ वर्षात भारत देशाला दलित राष्ट्रपती मिळाले. मुस्लीम राष्ट्रपती मिळाले, महिला राष्ट्रपतीही मिळाल्या. सत्तेच्या पदांचा वाटप उदार आणि योग्य पद्धतीने झाले आहे.

या ६१ वर्षात देशाला एकत्र करणे, देशाला एकत्र ठेवणे, उद्योगधंदे वाढवणे, विकसनशिल राष्ट्र होईपर्यंत मजल मारणे याचे भारतीय श्रेय राज्यकर्त्यांना निश्चितच आहे.

पुढच्या ६० ते ७० वर्षात भारताला कोणत्या प्रकारचे राज्यकर्ते मिळणार त्यावरच भारत देशाचे भविष्य अवलंबून असणार आहे. म्हणूनच भारतीय जनतेने आपले प्रतिनिधी निवडताना अभ्यासू, हूशार, कार्यशील, आपल्या विभागातील समस्या ज्याने जास्त सोडवल्या असे निवडावे.

भारताचा सहा दशकाचा, साठ वर्षाचा काळ हा "स्थिरतेचा आणि प्रगतीकडे" नेणारा दिसला परंतू येणारा पूढील काळ हा "अस्थिरतेचा आणि अधोगतीकडे " नेणारा दिसत आहे.

जपान आपल्यापेक्षा लहान. दुसऱ्या महायुद्धात संपूर्ण बेचिराख झालेला. पण अ[illegible]रेकेलाही आर्थिक गोष्टीत टक्कर देत आहे.

आपला देश अमेरिका- जपान पेक्षा पाठी आहे. त्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक आरक्षन. आज आपल्याकडे ३० टक्के स्त्रियांकरिता, १० टक्के अमुक, १० टक्के तमुक, ५ टक्के ह्याला, ५ टक्के त्याला, आता ओपन गटातील हिंदू-मराठा जातीतील लोक सूद्धा आम्हाला आरक्षन दया म्हणत आहेत तर दूसऱ्या राज्यात मूस्लीमांना आरक्षण देऊ असे तेथील सरकार म्हणत आहेत. हे आरक्षणाचे भूत पुढील ५० - ६० वर्षात काढता आले तरच देश मोठा होईल अन्यथा काल नोकऱ्यांत आणि आज शिक्षणात जे सरकार आरक्षण देतेय ते उद्या खेळातही आरक्षण निर्माण करील आणि मग सांगायलाच नको!

देशाचे वाटोळे करणारा दूसरा घटक म्हणजे न्यायव्यवस्थेत साचत असलेली कोर्टप्रकरणे. आज न्यायालयातघडीला देशात ३ कोटीपेक्षा जास्त खटले पडून आहेत. केसचा निकाल १५- १५ वर्ष खालच्या कोर्टात लागत नाही आणि तिथून वरच्या कोर्टात पून्हा १५- १५ वर्ष लागत नाही. हा जो प्रकार न्यायव्यवस्थेत आहे त्याने न्यायव्यवस्था लोकांना शक्तिहीन वाटत जाईल, निरुपयोगी वाटत जाईल. न्यायव्यवस्था जो लोकशाहीचा एक खांब आहे तोच कुचकामाचा ठरेल पर्यायी देशाची काही अंशी बरबादी ठरलीच म्हणून समजा.

पहिली जमीन- जायदा- मारामारीचे प्रकरणे होती आता त्यात दरवर्षी हजारोंनी घटस्फोटाची प्रकरणे न्यायालयाकडे येत आहेत. त्यामुळे न्यायव्यवस्थेत आमुलाग्र नव्हे तर खूपच मोठ्या प्रमाणावर क्रांतीकारी निर्णयांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

देशात दारूची दुकाने वाढत आहेत. आपल्या देशातील मंत्रीच आता जनतेला 'वाईन' शरीराला फायदेशीर आहे हे



Scanned with CamScanner

सांगत आहे. (उद्या सिगारेट, गांजा, चरस ही आरोग्याला पोषक आहे हे सांगतील ) असे झाले तर पुढील तरुण पिढी रस्त्यावर दारु पिऊन पडलेली दिसतील. तरी गावा- गावांत दारुची बाटली आणि दारुची दुकाने बंद झाली पाहिजेत. किंवा येत्या काही वर्षात कमी झाली पाहिजेत. तरच देशाचा तरुण, देशाची प्रगती आणि देशाचे संरक्षण करु शकेल.

चीन विरूद्धच्या १९६५ च्या युद्धात भारतीय सैन्याला नामुष्कीची हार पत्करावी लागली होती. ज्या चीनने आपला हजारो चौरस किलोमीटरचा परिसर बळकवला आहे, जो चीन भविष्यात भारताला उद्योग आणि इतर क्षेत्रात भारी ठरणार आहे. त्याच चीनचा माल आपण भारतीय लोक स्वस्त आणि सूदंर म्हणून खेळण्यांपासून ते मोबाइलपर्यंत सर्व वस्तू विकत घेत आहोत व आपले पैसे त्यांना देऊन त्यांना ताकदवान करत आहोत.

शत्रू राष्ट्राचा माल विकत घेणे हे खऱ्या देशप्रेमी नागरीकांस शोभणार नाही. देशाच्या दुश्मनाचा माल फक्त देशद्रोहीच विकत घेऊ शकतात किंवा मूर्खच घेऊ शकतात आणि आपल्या देशात असे तरुण - तरुणी - स्त्रिया- पुरुष असतील तर हा भारत देश ज्या महात्मा गांधीनी इंग्रजांना भारतभूमीतुन काढण्यासाठी परदेशी (इंग्रजी ) मालाची होळी करायला सांगितली, तोच भारतभूमीतील मनुष्य, भारताचीच होळी करुन बसेल.

भारताचा ६१ व्या वर्षात औद्योगिक दृष्टया विकास झाला, पण सांस्कृतिक दृष्टया आपण प्रगतीऐवजी अधोगतीकडे जात आहे.

प्रथम दूहेरी पालकत्व असायचे म्हणजे आई आणि वडील दोघांचे. आता एकेरी पालकत्व येऊ लागले आहे. अजून २०- २५ वर्षानंतर दुहेरी पालकत्व, एकेरी पालकत्व जाऊन पालकत्व नसलेलीच मूले सगळीकडे आढळतील. कुत्र्याच्या पिलांना जसे आपले आई- बाप माहित नसतात तसेच भारतातील येणाऱ्या पिढीला आपली आई - वडिल माहित नसतील.

देश स्वातंत्र्यानंतर प्रगत व्हावा, सुशिक्षित व्हावा, देशातील नागरीक आणि राज्यकर्त्ये त्यादृष्टीने आपला भारत देश पुढे नेवो हीच आशा

जय हिंद जय भारत.

संपादक
नारायण डोंगरे


**६१ व्या स्वातंत्र दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

M : 9819135826

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A)**

**दिवा शिळ विभाग**

अध्यक्ष : **एकनाथ भगत**

संपर्क कार्यालय

नारायण निवास, दिवा शिळ रोड, दिवा स्टेशन (पूर्व), ठाणे ४०० ६१२.




Scanned with CamScanner

## विशेष संपादकीय

# पोलिसही माणूस आहे!

एखाद्या स्त्रिला प्रसुतीसाठी जेवढया वेदना सोसाव्या लागतात त्यापेक्षाही अधिक यातना पोलिसांना सोसाव्या लागतात. हे वास्तव्य नाकारून चालणार नाही. दिवसांतले बारा बारा तास आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांना आपल्या घर परिवाराची काळजी करण्याचीही फुरसत मिळत नाही कामाचा फार वाढता ताण कुणाला सांगु शकत नाहीत. सुट्टी म्हणाल तर त्यांना नसतेच त्यांचा सण सुद कर्तव्य बजावतच साजरा करावा लागतो स्वत:चे सर्वकाही वर्दीसाठी पणाला लावून स्वत:च्या इच्छा मारत काम करावे लागते.

पोलिसही आमच्या तुमच्यातला माणूसच आहे ना! का विसरतात लोक हेच कळत नाही. काही मोजक्या नतभ्रष्ट पोलिसांमुळे संपूर्ण पोलिस यंत्रणेला दोष देणे योग्य आहे काय? पोलिस म्हणजे जन सेवेचा वसा घेतलेला सदाचारी विचारी दूत होय? फक्त जनसेवा ज्याचा हेतु कर्तव्य पूर्ततेची ज्यांनी शपथ घेतलेली आहे व त्या शपथेला जे पोलिस इमाने इतबारे कर्तव्य बजावतात त्या सर्व पोलिसांचा आदर्श नविन पोलिसांनी घ्यावयाला हवा. धेयाने झपाटून जाणे भ्रष्टाचाराच्या भस्मासुराला तिलांजली देणे जे आपला धर्म समजतात त्या पोलिसांची व्याख्या करणे फार अवघड आहे. केवळ वरिष्ठाच्या मर्जी खातर मनात नसतांनाही एखादे काम करण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा मात्र पोलिसांचा कस



लागतो आपल्या परिने जो तो इथे आपल्या कर्तव्य कर्माची लढाई लढताना दिसतो, या मुंबई नगरीची सारी दारोमदार पोलिस मुंबई पोलिसांवरच असते. मनुष्य बळ कमी सोई सुविधांचा अभाव, गुन्हेगारीचा प्रभाव असतांनाही पोलीस कुठे म्हणाल तर कमी पडत नाही जिथे तिथे त्याच्या सेवेचे योगदान बहुमोल असते तरी सुध्दा सर्वसामान्य माणसापासून ते उच्च वर्गापर्यंत त्यांची व्यथा कोणी समजूनच घेत नाही वाढती महागाई, तोकडा पगार, वास्तव्याचा बिकट प्रश्न निवृत्तीचे भयंकर संकट ह्या बाबी पोलीसांच्या जिवणाशी किती निकटच्या आहेत याचा कोणीतरी विचार करायला पाहिजे; पोलिसांच्या समस्यांची (बेजवार) बेरीज बजाबाकी हिशोब लावणे शासनाचे अग्रगण्य काम आहे. परंतु शासन आणि शासनातर्फे या पोलीस वेशातल्या माणसाला माणूस म्हणून न्याय देईल तरच पोलीसही माणूस आहे असे म्हणावे लागेल.("पोलीस हा जनतेचा मित्र आहे") खरे बोलल्याने लक्षात ठेवण्याची गरज पडत नाही. ■


**HARI SHREE**

**ALUMINIUM WORKS**

ALUMINIUM DOORS, WINDOWS RAILINGS, SINTEX DOOR, PARTITION & ALL ALUMINIUM WORKS

Gala No. 5, Dongre Sadan, Sakinaka, Mumbai - 400 072
Off. C/o.: 2859 2948, 2852 6208
Mob. : 9821624312, Res. : 56018030.


**सौंदर्य पुरेपुर भरलेले आहे**

*प्रल्हादाच्या ध्येय निष्ठेत*
*कर्णाच्या दातृत्वात*
*बुध्दाच्या अहिंसेत*
*जहांगीराच्या न्यायात*
*बाजीप्रभूच्या स्वामी निष्ठेत*
*ध्रुवाच्या ईश्वर भक्तीत*
*संभाजींच्या कार्यप्रतीत*

प्रतिभा काळे
भांडुप



Scanned with CamScanner

## आदर्श शिक्षक होण्यासाठी शिक्षकांची काही कर्तव्ये

१) सर्व विद्यार्थ्यांवर प्रेम करणे हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य आहे, प्रेमाने बोलणे, हसणे व त्याप्रमाणे वागणे हे होय.

२) शिक्षक हे आई समान असतात. ज्याप्रमाणे आई मुलांना बरे वाईट काय ते शिकवते. त्याप्रमाणे शिक्षक देखील मुलांना शिकवतात.

३) मुलांना चांगली शिकवण दिल्यास त्याचे परिवर्तन आदर्शात होईल व विद्यार्थी चांगले घडतील याची जाण आजच्या शिक्षकांनी ठेवावी.

४) चांगले बिज पेरले तर चांगलेच उगवणार हे निश्चितच आहे १ दाना पेरल्यास २५० दाणे निर्माण होतात. परंतु जमीन सुपीक सुंदर असेल तर तशी शाळा कॉलेजेस चांगली असतील तर एक आदर्श शिक्षक एक हजार मुलांना आदर्श बनवू शकतो.

५) शिक्षकांत चांगले गुण असतील तर विद्यार्थी चांगले निर्माण होतील.

६) जसे शिक्षकांना चांगले वागले पाहिजे तसे विद्यार्थ्यांनी गुरुस आदर्श मानले पाहिजे.

७) गुरुच ब्रम्हा आहे, गुरुच विष्णू आहे व गुरुच महेश आहे. तेव्हा गुरुची महिमा सांगतांना अनेक गुरु श्रेष्ठ ठरले व त्यांनी माठा आदर्श घडवून आणला.

८) गुरुची श्रेष्ठता त्याच्या वागण्यात, बोलण्यात, आचरणात आहे ती त्याच्या सौजन्य वागलयाने प्रेमळ बोलण्याने व आत्मसात केल्याने सर्वच काही मंगल होईल याची गुरुला जाणीव असली पहिजे. तरच आदर्श विद्यार्थ्यांची अपेक्षा करता येईल.

## कुमारांनो हे आदर्श पाळा.

१) पित्याची आज्ञा शिरसावंद मानून बारा वर्षे वनवासात राहण्यास आनंदाने तयार होण्याची प्रभु राम चंद्रांची - पितृभक्ती.

२) पित्याच्या मांडीवरून आईने ढकलले हा अपमान सहन न झाल्यामुळे ध्रुवाने जेथून कोणी ढकलणार नाही असे अढळ पद मिळवण्यासाठी अरण्यात जावून घोर तपश्चर्या करून देवाला प्रसन्न करून अढळ पद मिळवले त्या ध्रुवाचा - दृढनिश्चय.

३) आपला सर्व खजिना गोर-गरीबांना दान धर्म करून केवळ एकटेच वेगळे राहण्याची हर्षवर्धनाची - त्याग वृत्ती.

४) पर्वतावरून पित्याने खाली लोटले, आग्नीत टाकले, सुळावर चढवले तरी नारायणाचे स्मरण केल्याशिवाय राहणार नाही असे पित्याला सांगणाऱ्या प्रल्हादाचा - ध्येयवादीपना

५) स्वत:वर मरण ओढविणार हे नक्की माहित असूनही आपली कवच कुंडले काढून देणाऱ्या कर्जाचा - उदारपणा.

६) प्राण गेला तरी बेहत्तर! पण मी माझा धर्म सोडणार नाही असे स्पष्टपणे औरंगजेबाला सांगणाऱ्या संभाजीची धर्मनिष्ठा.

७) तुम्हाला देहांत प्रायश्चित्त द्यावयास पाहिजे असे राघोबाला सांगणाऱ्या रामशास्त्री प्रभुने यांची - न्यायनिष्ठा.

८) स्वदेशासाठी परदेशी मालावर बहिष्कार घाला म्हणून सांगून मोटारीखाली चिरडून मरणाऱ्या बाबु गेणूची - देशभक्ती.

९) स्वप्नातील दान खरे करण्यासाठी राज्यत्याग करून व स्वत:ला, बायकोला व मुलाला विकून दान पूर्ण कारणाऱ्या हरिश्चंद्राची - सत्यनिष्ठा.

## संस्कार-सिंचन पालकांनी लक्ष द्यावे

१) मुलांवर उत्तम संस्कार क

२) त्यांच्या मनात चांगले विचार रुजण्यासाठी त्यांना संत्संगला घेवून जावे.

३) चांगली पुस्तके वाचावयास द्यावी.

४) सुंदर व प्रेरक कथा सांगाव्यात

५) संयम राग द्वेश, मत्सर यापासून कसे दूर राहाता येईल ते सांगावे.

६) ब्रह्मचर्याचा महिमा समजावून सांगावा.

७) उनाड खोडकर मुलाला प्रेमाने शिरस्त लावून त्यांच्याकडून घरचा अभ्यास पूर्ण करवून घ्यावा.


हार्दिक शुभेच्छा

संस्थापक/ अध्यक्ष :
बबनराव काटकर

जनसेवा शिक्षण प्रसारक ट्रस्ट

शिवनेरी विद्यालय

इंदिरा नगर, गली नं. १७, मंडाळा पोलिस चौकी
रोड, [illegible] (प), मुंबई-४०००४३.
मोबाईल : ९३२३८७७४६७, ९२२४१७९५०

मार्गदर्शक : महालक्ष्मी महिला विकास मंडळ




Scanned with CamScanner

# संस्कृती चालली बिघडत पण; चित्रपट का नाही सुधरत!



चित्रपटमय झालेले हे जग बघताना मनाला खंत वाटते. याच चित्रपटावर आधारित उभी केलेली प्रेमाची शिडी आजच्या भावी तरुणांना त्यांच्या सत्कार्यापासून वंचित करू पाहत आहे. त्यांना त्यांच्या विचारापासून लांबवू पहात आहे. अश्लिल चित्रपट बघून त्यांचे मन एका वेगळ्याच दुनियेत विहार करते. चित्रपटातील हिरो हिरॉईन यांनी तर सारी मुंबई कपडयांनी विकत घेतली आहे असे वाटते. सध्या तर या सिनेमासृष्टीला अंकुर फुटत चालला आहे सुंदर कपडयांनी नटलेली हिरॉईन बघून तर आजचे भावी तरूण चक्रावूनच जातात. त्यांना स्वत:चे भान रहात नाही. अशा ह्या दृष्टचक्रात फसून ते चक्रम बनतात.

सध्या तर कॉलेजचे वातावरण वेगळ्याच प्रकाराचे असते. त्या ठिकाणी टपोरी मुले चव्हाट्यावर बसून सिगारेट ओढताना दिसून येतात. मुलींची छेड काढणे हा त्यांचा व्यवसाय असतो. त्याला मुळ कारणीभूत कोण ? असेल तर सध्या निघालेले अश्लील चित्रपटच होय! त्यातूनच संघर्षाचा पुनर्जन्म होतो आणि आपले हरीतक्रांतीप्रमाणे असणारे भारतीय तरुण मोहिनीच्या मोहपाशात गुरफटून स्वत:चे बरे वाईट करून घेतात. थोर संताचे, देवांचे असणारे हे जन्मस्थान अपवित्र होत चालले आहे. प्रत्येकजण आपले कर्तव्य विसरत चालला आहे. सिनेमात ज्याप्रमाणे श्रीमंत बापाची मुले सुखाच्या चैनीचा बाजार मांडतात त्याप्रमाणे आपले आईवडील आपल्या जीवाची चैन करु देत नाहीत. म्हणून मुले नाराज होतात. जन्मदात्यास विसरून त्यांना शिव्या देखील देतात.

अशाप्रकारे सिनेमामध्ये मांडलेला हा मनाचा बाजार भरतीस येत आहे. या बाजारात बरेचसे भावी नवतरुण बाजारभाव करण्यास येतात. नावारुपाला आलेला सिनेमा काही तरुण ५० ते १०० वेळ बघण्याचे कष्ट सोसतात. पण त्यावर नियंत्रणाची गुरुकिल्ली शोधत नाहीत. ते सिनेमाची कास सोडण्यास तयार नसतात. सिनेमामध्ये दाखविल्या गेलेल्या प्रत्येक भागाचे अनुकरण करून वाईट तेच निवडण्याचा प्रयत्न करतात. चित्रपटाचे दर अफाटच वाढले आहेत. एक सिनेमा थेटरात जाऊन, बघायचे ठरविले की हिरवी नोट (१००) पॉकिटमध्ये असणे गरजेचे असते.

चित्रपट हे लैला मजनूंच्या प्रेमाचे उगमस्थान आहे. ह्यातून लहान मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो. ज्याप्रमाणे भक्तिरसातून कव्वाली निर्माण होते. त्याचप्रमाणे भारतीय सुपुत्राच्या मुखातून सिनेमाची अश्लील गाणी न निघता भक्तिरसातून साकार झालेल्या कव्वालीप्रमाणे भक्तिरसाचे मधुर सुस्वर निघाले पाहिजेत. अशाप्रकारचे चित्रपट काढणे आवश्यक आहे आणि ते राबविण्यासाठी प्रभावी संघटनेची स्थापना करून अशा चित्रपटांना पुढाऱ्यांचे स्थान मिळालेच पाहिजे. हे जीवन, भावी आयुष्य घडविण्यासाठी असून त्याचा सदुपयोग करून घेतला पाहिजे. त्यासाठी शुध्दविचारी मुलांनी आपले विचार आपल्याघराच्या मर्यादित वर्तुळातच न ठेवता ते तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सज्ज असले पाहिजे. सिनेमा आदर्श असला पाहिजे. देवादिकांवर चित्रपट निघाले पाहिजेत. ज्याप्रमाणे वैकुंठवासनंतरही चोखामेळाच्या अस्थितून विठ्ठलाच्या नामाचा गजर होत राहिला. त्याप्रमाणे प्रत्येकाच्या मुखातून विठ्ठलाच्या नामाचा गजर निघाला पाहिजे. तरच वाट मुकलेल्या या भावी भारतीय सुपुत्रांना तो विधाता वाचवू शकेल.

अश्लील चित्रपट म्हणजे भारतीय संस्कृतीला लागलेली कीड आहे. ती सर्वत्र फैलावत चालली आहे. ती साथीप्रमाणे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाते. आणि समाजाचा पाया ढासळतो. त्यावर एकच उपाय आहे. आणि तो म्हणजे दुरदर्शनवाल्यांना व चित्रपट निर्मात्यांना भावी तरुणांवर होणाऱ्या या परिणामांची जाणीव असून देखील ते तशाच प्रकारचे चित्रपट काढतात ही लज्जास्पद गोष्ट आहे. आपणच पुढाकार घेऊन त्यांनी अश्लील चित्रपट दाखविण्यापासून बंधन घातले पाहिजे.

नदीचे पाणी ज्याप्रमाणे वाहत जाते. त्याप्रमाणे सिनेमांचा हा कुष्ठरोग फैलावण्याच्या अगोदर तरुण पिढी जाणती असली पाहिजे. चांगले काय ? वाईट काय ? हे त्यांना राजहंसाप्रमाणे



Scanned with CamScanner

नदीचे पाणी ज्याप्रमाणे वाहत जाते. त्याप्रमाणे सिनेमांचा हा कुष्ठरोग फैलावण्याच्या अगोदर तरुण पिढी जाणती असली पाहिजे. चांगले काय? वाईट काय? हे त्यांना राजहंसाप्रमाणे निवडता आले पाहिजे. त्यासाठी ज्ञानाच्या कसोटीवर जगणाऱ्या माणसांची आज गरज आहे. प्रत्येक सिनेमा हा भरगच्च अशा मालमसाल्याने भरलेला असतो. त्यामध्ये असणारे भडक देखावे दोषपर्णू वातावरण समाजात निर्माण करतात. तरुणांच्या रोमारोमांत वाईट चित्रपटाबद्दल क्रांती निर्माण झाली पाहिजे. अश्लील चित्रपट थांबविले पाहिजेत. त्यासाठी संतमंडळीनी ज्याप्रमाणे आपल्या विचारांचा झेंडा फडकविला त्याप्रमाणे बुध्दिमान व्यक्तींनी आपले विचार अंत:करणात गुपित न ठेवता ते उघडपणे मांडण्यास शिकले पाहिजे. व वाहत चाललेल्या भावी नवतरुणांना आदर्शाचा आसरा दिला पाहिजे. समाजघातक असलेल्या चित्रपटापासून तरुणांनी सदैवदूरच असले पाहिजे. ज्या चित्रपटात सदगुण असतील ते घेण्यास हरकत नाही. पण त्याप्रमाणे वागले पाहिजे. स्वत:च्या बुध्दिमत्तेवर ज्ञानाचे भांडवल उभे करता आले पाहिजे. चांगले काय?वाईट काय हे निवडण्याची चौकस बुध्दी असली पाहिजे.

सदर लेखात चित्रपट कोणत्या प्रकारचे आणि कसे असावेत याचा उल्लेख केला आहे. ज्ञानाच्या कसोटीवर जगणाऱ्या माणसांची आज समाजाला गरज आहे. भारतीय समाजाला लागलेली कीड म्हणजेच अश्लील चित्रपट होय. त्याच्यापासून ज्ञानी माणसाने अलिप्त असले पाहिजे.

- प्रणय पाटील


तेजस्वीनी थिएटर्स (मुंबई) निर्मित
अक्षय सादर करीत आहे

जयराज खरात : ९९२०७४३३०६
९८९९५२०५५८
विजय खरात : ९८७०२५९९६३
एकनाथ आल्हाट : ९८९०३७७६६१

*धमाल दणकेबाज,*
*बतावण्या, लावण्या,*
*लोकनृत्ये, दर्जेदार*
*वाद्यवृंद, लोकगीते, मराठमोळा कार्यक्रम*

# लावंण्याची लावणी



निर्माता - जयराज खरात सावरगांवकर
सहनिर्माता - सौ. ज्योती खरात सावरगांवकर
नृत्य दिग्दर्शक/नृत्ये - तेजस्वीनी खरात सावरगांवकर


## सौंदर्य कशात आहे?

भिष्माच्या प्रतिज्ञेत
अर्जुनाच्या एकाग्रचिंतेत
एकलव्याच्या गुरुभक्तीत
हरिशचंद्राच्या सत्य वचनात
श्रावणाच्या पितृ भक्तीत
रामाच्या एक पत्नी व्रतात
भागीरथाच्या प्रयत्न वादात
सुर्याच्या प्रकाशात
मेघाच्या जलात
नभाच्या ताऱ्यात
चंद्राच्या कोरीत
प्रेमाच्या भावनात
स्त्रियांच्या मनात
माणसांच्या करुनेत
निर्मळ स्वच्छ पाण्यात
सौंदर्य समावलेले आहे.

**सोनाली काळे**
भांडूप



Scanned with CamScanner

# ॲंग्री यंग मॅन
# अमिताभ बच्चन



**प्रिय आमिताभ**

हिंदी मध्ये भगवान का शुक्र है की, तुम आज तक सुखी हो। वास्तव में कुली के बोझेसे तुम दब गए थे, जैसे बरसात की एक रात किसी दिवार को गिरा देती है। मगर जो लोंग खुद्दार होते है, उनका नसीब उनको साथ देता है। तुम कभी कभी अपनी शक्ती का दुरपयोग करके झुटी शान दिखला देते हो। इस कारण तुम कामयाब तो हो मगर अमर नही हो। तुम अपने शोले पर आज भी कायम हो। जया बच्चन का सुहाग खतरे में हो ही नही सकता मगर तुम भी मुकंदर का सिकंदर हो। भला हो की ब्रिच कॅंडी अस्ताप के डॉक्टरने तुम्हे पुकार लिया जो उन्हे तुम्हारी इलाज में कोई हेराफेरी नही की। कोई डॉक्टर मिस्टर नटवरलाल नही बना सब के सब नमक हलाल निकले। कभी कभी तुम अपने को लावारीस समझने लगते हो मगर अब तो यह बात साबीत हो चुकी है की, अपने देश में और विदेश में करोडो तुम्हारे प्रेमी है, सबसे तुम्हारा याराना, दोस्ताना है। तुम तो एक महान देशप्रेमी हो तुम्हारा प्रेम भी बेमीसाल है,मै किससे मुकाबला करु तुम्हारा अभिनय करु तुम्हारा अभिनय की प्रशंसा करने में मजबुर हो इमान धर्म जात तो यह है की तुम कभी बेइमान नही रहोगे गंगा की सोगंध करोडो देशवासीयोकोंके चेहरे पर प्रसन्नता है की, तुम अब ठीक हो। भगवान की अदालत में देर है अंधेरे नही यह बात अलग है की दुनिया में सत्ते पे सत्ता चलना है। एक आखरी सवाल में तुमसे पुछता हुँ वह यह है की क्यू अब फिल्म नगरी छोडकर तुम राजनिती में जाने का सिलसिला अबतक नही है मगर अब तुम शराबी बनकर जादा पिते हो। इसलिए तबियत सुस्त रहती है। अंत में मै यह कहोगें की तुम आनंद में रहो तुम जियो हजोरो साल साल में दिन हो पचास हजार।


पाहिजेत

## फिल्म कलाकार पाहिजेत

जर आपण कलाकार नसालं आणि चित्रपटात काम करण्याचा आपणास शौक असेल तर योग्य फीस १५९०/- भरुन शिकून फक्त आमच्या चित्रपटात काम करु शकता

गरजुनी योग्य उत्तराच्या पाकिटासह पत्रव्यवहार करावा

* पत्ता *

न्यू मॉडर्न ॲक्टींग वर्कशॉप

३ महिने का ॲक्टींग कोर्स कीजिए

आपके घर सिखीये

संपूर्ण फिल्म और टी. व्ही. क्री टेक्नीक के साथ

अधिक जानकारी के लिए संपर्क

मोबाईल : ९२२४४०९८८१




Scanned with CamScanner

# टिळकांनी स्वराज्य मिळवून दिले ते हेच का ?

- विनोद ग्रेटकर

## सर्वोच्च न्यायालयात अधिकारी वर्गावर पाठीवर ताशेरे

तुम्हाला काम करायला लावण्यासाठी पाठीवर हंटर ओढायला हवा अशी कडक शब्दात सर्वोच्च न्यायालयाने सरकारी अधिकाऱ्यांना ताशेरे ओढले.

सर्वसामान्य लोकांच्या फिर्यादी नोंदवून न घेणाऱ्या पोलिसांवर काय कारवाई करावी याबाबतचे उत्तर ही देण्याचीही तसदी अनेक राज्यांनी न घेतल्याने सर्वोच्च न्यायालयातून न्यायाधीश रागात म्हणाले, या देशाला प्रत्यक्ष परमेश्वर सुद्धा वाचवू शकत नाही. असे ताशेर न्यायालयाने अगोदरच ओढले होते.पोलीस ठाण्यामध्ये सर्वसामान्य नागरीकांच्या तक्रारी नोंदवून घेतल्या जात नसल्याच्या अनेकांच्या तक्रारी होत्या. अशा नागरीकांनी दंडाधिकाऱ्यांकडे दाद मागावी आणि दंडाधिकाऱ्यांनी पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्याचे आदेश द्यावेत. असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. मात्र तरीदेखील पोलीसांनी तक्रारी नोंदवून न घेतल्यास त्यांना तुरुंगात डांबावे आणि बेशिस्तीबाबतची कडक कारवाई त्यांच्यावर करावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १४ जुलै रोजी दिले. याबाबत सर्व राज्याच्या अधिकाऱ्यांनी तीन आठवडयात आपले म्हणणे कोर्टाला सादर करावे असेही स्पष्ट केले होते. मात्र सुनावणीच्या वेळी उत्तर प्रदेश व अरुणाचल प्रदेश या दोनच राज्यांनी आपले म्हणणे सादर केल्याचे आढळल्याने न्यायाधीश रागावले. स्वराज्य म्हणतात ते हेच काय ? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती बी. एन. अग्रवाल, जी. एस. संघवी यांच्या पिठाने विचारला. त्या अधिकाऱ्यानी आदेशाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल न्यायालय संतप्त झाले. दोन राज्य वगळता राज्याच्या अधिकाऱ्यांनी आपले म्हणणे मांडण्याबाबत फिकीरही केली नाही. काही राज्यांनी सरळ आपल्या वकिलांना पुढे केले. हे सर्व पाहता टिळकांनी स्वराज्य मिळवून दिले ते हेच का ? असा सवाल सर्वसामान्य लोकांना पडतो. ■


प्रफुल्लकुमार एस. भागवत

राष्ट्रीय अध्यक्ष

संपर्क : ९३२१०२१०८५, ९३२२०२४६७४, ९४२२०९०४८३

राष्ट्रवादी जनता पार्टी

४०१, अे, रोशनी अपार्टमेंट, जुने विठ्ठल मंदिर जवळ, विठ्ठलवाडी रेल्वे स्टे काटेमानिवली, कल्याण (पूर्व), जि. ठाणे - ४२१ ३०६ (महाराष्ट्र)




Scanned with CamScanner

माहितीच्या अधिकाराचे अनेक फायदे आहेत मात्र त्याद्वारे मिळालेल्या माहितीचा दुरुपयोग होत असेल संबंधित व्यक्ती कारवाईस पात्र ठरू शकते, अशी माहिती राज्याचे माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांनी दिली. हिंदू जागृती गणेशोत्सव मंडळाच्यावतीने सहयोग मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतीत एक प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी हा खुलासा केला. प्रसिध्द निवेदक श्रीराम केळकर यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली.

दीड तास रंगलेल्या या मुलखतीत जोशी यांनी माहितीचा अधिकार कसा वापरावा, सर्वसामान्यांनी माहिती मिळवताना कोणती काळजी घ्यावी, याविषयीची माहिती उपस्थितांना दिली. माहिती मागविणारी व्यक्ती माहितीचा दुरुपयोग करीत असल्यास त्यावर कोणती कारवाई होऊ शकते याबाबत केळकर यांनी विचारले असता, कृष्णा खोरे प्रकल्पाचे उदाहरण दिले. एका व्यक्तीने या प्रकल्पाची संपूर्ण माहिती मागविली होती. पाच लाखाच्या दस्तऐवजासाठी दहा लाख रुपये खर्च होता. तसेच या माहितीचा दुरुपयोग होणार, याची खात्री पटल्याने माहिती देण्यास नकार देण्यात आला. उद्देश स्पष्ट केल्याशिवाय



माहिती अधिकाराचे जनक
श्री.अण्णा हजारे

# माहिती अधिकाराचा दुरुपयोग करणारी व्यक्ती कारवाईस पात्र

## माहिती आयुक्त पी.एस.जोशी

माहिती मागितली जात असेल आणि कामात अडथळा आणण्याचा किंवा त्रास देण्याचा प्रयत्न होत असेल तर माहिती मागविणारी व्यक्ती दंडनीय कारवाईस पात्र ठरू शकते. माहिती मागविण्याची प्रक्रिया अत्यंत साधी, सोपी असल्याचे सांगून साध्या कागदावर दहा रुपयांचा कोर्ट फी स्टँप लावूनही माहिती मागविता येते, असे ते म्हणाले. दारिद्र्यरेषेखालील लोकांना .. देखील गरज नाही, असेही त्यांनी या वेळी नमूद केले. केंद्र सरकारच्या अखत्यारित विभागाकडून माहिती मागविताना स्टँप न लावता रोख दहा रुपये द्यावे लागतात. अर्ज दिल्याच्यातारखेपासून ३० दिवसांच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास तसे संबंधित अधिकाऱ्यांकडून लिहूनही घेता येऊ शकते, असेही त्यांनी सांगितले. प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या हिंदू जागृती गणेशोत्सव मंडळाने यंदा रामसेतू या विषयावर देखावा साकारला आहे. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तेथून एक शिळा आणली असून, ती पाण्यावर तरंगणारी आहे. त्यावर तज्ज्ञांचे संशोधन सुरु आहे. ●


Ajay G. Paulkar
9819235584
9833504101

अक्षय ॲड

* Hoardings
* Rly. Boards
* Kioad (Mumbai City)
* Rly. Stickers
* Rly. Emu
* Pannels
* News Papers Ads
* Bus Shelters (Mumbai City)
* Wall Painting
* Cloth Banners
* Digital Flex

'Matru Chhaya' Chhatrapati Shivaji Maharaj Rahivasi Sanghtna,
Opp. Shiv Mandir, V.P.'X' Road, Indira Nagar, Dombivili (E) - 421201




Scanned with CamScanner

# विचार प्रसार आपल्या मदतीला

सरकारी दरबारी आपली दखल घेतली जात नाही का ? पोलीस खात्याकडून आपल्यावर अन्याय होतोय का ? जिल्हापरिषदेत पालिकेकडून कामाची दिरंगाई होतेय का ? शासकीय पोलीस अधिकाऱ्यांकडून अडवणूक होतेय का ? जिल्हाअधिकारी, तहसिलदार, तलाठी अथवा वीज मंडळ, दुरध्वनी पाटबंधारे खात्याकडून आपली लूबाडणूक होतेय का ?

तर मग उचला फोन आणि कळवा आम्हाला आम्ही आपणांस न्याय मिळवून देवू. संबधीत खाते मंत्र्याकडे पाठपुरावा करू. तरीही न्याय न मिळाल्यास संबंधितांना आम्ही वृत्तपत्राच्या माध्यमातुन जनतेच्या न्यायालयात खेचू.

**विशेष टीप -:** संबंधित खाते, अधिकारी मंत्री यांना आपण पत्रव्यवहार केला असल्यास पत्रव्यवहाराच्या छायांकीत प्रति अर्जासोबत जोडाव्यात.

**त्वरीत संपर्क साधा - ९२२४५०४१९१ / ९२७०२५५२५६**
**फोन नं. २०५५०८४७ मोबाईल नंबर ९८२०५५०८६४**
**शिवाजी भगत सुधिर हेगिष्टे विनोद देशमुख**

## श्रावण आरती

आला सावळा श्रावण बारा मासांचा सम्राट,
मेघ तुतारी फुंकतो वारा धांवतो सोंसाट,
निळे शेमले बांधून उभे डोंगर थाटांत,
ओली हिरवळ नेसून वाट लाजते घाटांत,
नदी कुंवार बावरी तिची नजर सैराट,
**मेघ तुतारी फुंकतो................**
पाणी पिऊन शेताला आली भोंवळ क्षणांत,
आणि झिंगून पडले माड बांबूच्या बनांत,
एका बारक्या ओढयाचे मोट सुटले विराट,
**मेघ तुतारी फुंकतो................**
गाई वांसरे खिल्लार आले गोठयात भिजून,
मुकी पांखरे भिऊन गेली पंखांत निजून
खुळा वेधला पाचोळा घाली गोंधळ पिसाट
**मेघ तुतारी फुंकतो................**
दिशा सवाष्ण न्हालेल्या केस मोकळे सोडून,
वीज भावीण नाचते हाती काप [illegible]न,
भोळया पोटूशा मातीचे झाले उजळ ललाट,
**मेघ तुतारी फुंकतो................**
गर्ज आकाशी चौघडा, झांजा लाटांच्या वाजती,
टाळया पानापानांतून चाले श्रावण-आरती, आल्या लेझीम नाचत जलधारा पाठोपाठ
**मेघ तुतारी फुंकतो................**

## श्रीमंती गरीबी

ज्याप्रमाणे आकाशात चंद्र एकच असतो.
पण लाखो तारे चमचम करतात.
त्याच प्रमाणे भारतात लक्षावधी
लोक दारिद्रयात असले तरी हातावर
मोजण्याइतके उदयोगपती धनराशीत
लोळत असतात.


**मुळव्याध, पाईल्स, बवासीर नासुर**
**यांचा खात्रीशीर ईलाज**

***मुळव्याध, पाईल्स, बवासीर ह्या आजाराने त्रस्त असाल तर एकवेळा अवश्य भेट द्या.***

-: औषध मिळण्याचे ठिकाण :-

**रोशनी ज्युस सेंटर**

रेल्वे ब्रिजच्या बाजुला, अंबरनाथ (पूर्व)
घरचा पत्ता : गणेश देशमुख महालक्ष्मी नगर टेकडी,
अंबरनाथ (पूर्व) मो. ९८९००३२३०२




Scanned with CamScanner

# डोळ्याची निगा व दोष



## कमजोर नजर

सुर्योदयाच्या वेळी हिरव्या गवतावर अनवानी पायांनी चालल्याने डोळ्याचा दोष निघून जातो व डोळ्यांची नजर कमी झाल्यास तो दोष दूर होतो.

गवतावर रात्रभर पडणाऱ्या दवामुळे आर्द्रता असते. त्यामुळे नेत्रज्योती वाढते च आपल्या शरीरालाही त्यापासून लाभ होतो. व कालांतराने चष्मा न लावता नंबर कमी होतो तसेच मधाबरोबर ताज्या आवळयांचा रस घेतल्याने नेम ज्योत वाढते. असे रोज महिनाभर आवळयाचा रस सेवन केल्यास डोळयाचा आजार, डोळेदुखी, जळजळ तसेच कमी व धुकट दिसणे कमी होते तसेच डोळे तेज सुंदर व आकर्षक दिसतात.

**डोळयाखालील काळे घेरे**

पोट खराब झाल्याने, संतुलीत भोजन न घेतल्याने अति मानसिक तानामुळे, लिव्हर खराब असल्याने डोळयाखालील काळे घेरे पडतात. त्यामुळे मनुष्य किंवा स्त्रियांच्या डोळयाखाली काळे घेरे आल्याने त्याचे मन, डोळयाची कुरुपता डोळे खोल जाणे, शरीरात अशक्तपणा तसेच मानसिक व शारीरिक ताण ह्या सर्व कारणामुळे डोळयाचे आजारपण वाढत जाते चष्मा लागतो. नजर कमी होत जाते. डोळा अत्यंत नाजूक असल्यामुळे त्यांची निगा राखणे अत्यंत जरुरीचे आहे. दृष्टी, दिवददृटी व तिसरा डोळा ह्या डोळयाच्या अनेक दृष्टीपटलातून मनुष्य आपल्या सुंदर मनोरम नैसर्गिक दृश्याचे वर्ण— —रत असतो परंतु जे लोक जन्मजात आंधळे असतात त्यांना डोळयाचे महत्व काय माहित.

परंतु डोळयाची निगा राखणे हे अत्यंत आवश्यक असल्या कारणाने डोळया संबंधी वाचकास अधिक माहिती देवून डोळयाची निगा कशी राखावी डोळयाचे आजार कसे दुर करावेत. डोळे येणे, डोळे दुखणे, डोळयाखालचे काळेघोर कमजोर नजर, डोळयातून सारखे पाणी येणे, डोळयातील खाज डोळयात धुरकटपणा डोळयाचा मोतीबिंदू, चष्म्यापासून मुक्ती कशी मिळेल ह्या सर्व डोळयाचे आजार व त्यापासून मुक्तता करणारे डोळयाचे तज्ञ डॉक्टर आपणास योग्य मार्गदर्शन केले जाईल.

**नियमित वाचा विचार प्रसार**


हार्दिक शुभेच्छा !

Ph.: 287 33 22
287 33 44

AAIYE



LODGING
&
BOARDING

Sukhan Complex, Near Star Colony, Manpada Road, Dombivli (E) 421 201.

RomSon

DOMBIVLI (EAST)
Vira Shopping Centre,
Station Rd, Ph. 2861143

DOMBIVLI (WEST)
Janai Bldg., G G Road,
Ph.: 2484899





Scanned with CamScanner

# कल्याण महानगरपालिकेच्या पत्रकार संघात अध्यक्षपदी निवडून आलेल्या मा. अध्यक्षीय महोदयाचा जाहिरनामा

पत्रकार - श्री.सुहास पाटील

बंधु व भगिनी इकडे लक्ष द्या. आपल्या कल्याण डोंबिवली पत्रकार संघटनेचा अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी मी सुभाष दत्ताराम पटनाईक उभा राहत असून पत्रकार संघाच्या भवितव्यासाठी व पत्रकार संघाच्या प्रगतीसाठी मी कटीबद्ध राहणार आहे.सर्व पत्रकारांच्या पाठीमागे निर्भीड व निरपेक्षपणे कायम मी उभा राहत आलो आहे.

सर्व पत्रकारांना कायम स्वरूपात किमान वेतन व मानधन मिळविण्यासाठी तसेच सर्व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी मी कटीबद्ध राहणार आहे. सर्व पत्रकारांसाठी कायम स्वरूपात प्रेस नोट मिळेल. ह्यासाठी पत्रकार कक्षात कायम स्वरूपात लॉकर्स. शासकीय रूग्णालयात (महापालीका रूग्णालयात) मोफत औषध उपचार वैद्याकीय सहाय्य व शस्त्रक्रियेसाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध राहणार आहे. जेष्ठ पत्रकारांचा मान राखून त्यांच्यासाठी निवृत्ती वेतनासंदर्भात कायम स्वरूपात योजना अमलात आणण्याचा प्रयत्न करणार आहे.सर्व पत्रकारांसाठी मोफत पुस्तकांचे ग्रंथालय, फॅक्स सुविधा, कागदपत्रांची व पेनांची सुविधा महापालिका कक्षात करणार आहेत.

महापालिका क्षेत्रात मोफत प्रवासाची सुविधा देण्याचा प्रयत्न नव्हे तर कटिबद्ध राहणार आहे. सर्व पत्रकारांसाठी संघाचे ओळखपत्र व त्यांच्यासाठी कायदेविषयक सल्लाकेंद्र पत्रकारांसाठी कायमस्वरूपात कायदेशीर वकील उभा करणार आहे. तसेच अधिकृत पत्रकारांसाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी (S.E.O) होण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन व शिफारस पत्र उपलब्ध करून देणार आहे. पत्रकारांच्याकरीता कार्यशाळा व मोफत व्यसनमुक्ती सल्लाकेंद्र त्यांना मार्गदर्शन करायला जेष्ठ पत्रकारांची व्याख्याने व तज्ञांची व्याख्याने आयोजीत करणार आहेत.

पत्रकारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती तसेच खेळात अग्रेसर विद्यार्थ्यांना मानधन पत्रकारांसाठी ५ लाखांचा प्रत्येकी विमा उतरविण्यात येणार आहे.आपल्या मागण्यांचा मान रखण्यात येणार असुन दर आठवडयाला संघाची बैठक घेण्यात येणार आहेत. व सर्वांत प्रथम संस्था नोंदणी करून पत्रकारांच्या संघासाठी कायमस्वरूपात संघाचा निधी उपलब्ध करणार आहे. संस्थेला शासकीय भुखंड मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम कटीबद्ध राहीन अशी मी प्रतिज्ञा करीत आहे.

**वरील जाहिरनाम्यातील कर्तव्ये अध्यक्षमहोदयांनी कर्तव्यदक्षपणे पार पाडावी नसता "तुम्ही आम्ही भाऊ भाऊ, दोघे मिळून खाऊ" असे होऊ नये म्हणजे झाले!**


Vivekananda Dagare
93236 03705, 93249 81691



Heramb
KENNEL

All Breed of Dogs &
Puppy Available
Police & House Training,
Lodging & Boarding

Amar Mukherjee : 9324979588

CITY MOTOR BAZAR

*All Kinds of Two Wheeler & Four Wheeler & Old Sale & Purchase on Commission Basis.*



6, Kailash Darshan,
Near Hidustan
Bank, B.P.Road,
Dombivli (W).




Scanned with CamScanner

# सर्व प्रकारच्या रोगांवर अन्न हेच औषध आहे

सुहास पाटील

शरीराचे भरण व पोषण हे आपण घेत असलेल्याआहारावर होत असते. योग्य आहार घेतल्याने जसे शरीर निरोगी राहते तसेच आरोग्य आहार घेतल्याने शरीरात रोग निर्माण होतात. शरीराचे आरोग्य विघडते याचा अर्थ असा आहे की, अन्न हेच शरीराच्या आरोग्याला आणि रोगअवस्था कारणीभूत आहे म्हणून रोग निवारण्यासाठीही अन्नाचाच उपयोग होऊ शकतो. याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

शरीर अवस्था हि जशी अन्नावर अवलंबून आहे तसेच शीरावर नियंत्रण ठेवणाऱ्या मनाचे स्वास्तही निरोगी शरीरावर अवलंबून असते. निरोगी विकारी व निविकारी मन हे आपण घेत असलेल्या अन्नाने बनत असतो हा दुसरा महत्वाचा सिध्दांत आपण येथे विचारात घेतला पाहिजे.

सात्विक आहाराने सात्विक प्रवृत्ती व राजस तमस आहाराने मनाची राजसी व तामसी प्रवृत्ती होते. ही गोष्टही वरील सिध्दांतात अनुसरुन असते हे ज्ञान सहज समजू शकेल असेच असते. म्हणून अन्न कसे खावे, का खावे, कोणते खावे व कशासाठी खावे याचा प्रत्येक व्यक्तीने विचार करुनच सेवन करावे निव्वळ पोट भरण्यासाठी खाणे किंवा जगण्यासाठी खाने ह्या दोन प्रवृत्तींची माणसे आहेत.

१. जगण्यासाठी खाणे, २. खाण्यासाठी जगणे.

